महाराष्ट्र अराजपत्रित सेवा गट-ब मुख्य परीक्षा-२०२३ (पेपर क्र.1)
दि. ५ नोव्हेंबर, २०२३

**2023**

संच क्र. **A**

# प्रश्नपुस्तिका – I
## मराठी व इंग्रजी

**C18**

प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. 107061

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 200

वेळ : 1 (एक) तास

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. खाली दिलेल्या शब्दांतील देशी शब्द ओळखा.

अ. भाकरी
ब. गाजर
क. बटाटा
ड. बाजरी

(1) अ आणि क (2) अ आणि ब (3) क (4) ड

2. खालीलपैकी कोणत्या शब्दांना संस्कृत उपसर्ग लागलेले आहेत ?

(1) आधार, उत्तम, निग्रह (2) अजाण, अवजड, पणतू
(3) लाचार, बिनतोड, नाराज (4) भरधाव, गैरहजर, गैरसमज

3. खालीलपैकी 'अभ्यस्त' शब्द कोणता ?

(1) सुखकर (2) प्रहार
(3) रिकाम टेकडा (4) कधी कधी

4. योग्य जोड्या लावा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| a. | तत्सम शब्द | i. | धोंडा, ढेकूण, बाजरी |
| b. | तद्भव शब्द | ii. | तिकिट, बटाटा, सामान |
| c. | देशी शब्द | iii. | पुष्प, कन्या, नदी |
| d. | परभाषी शब्द | iv. | भाऊ, पान, ओठ |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | ii | i |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | ii | iii | iv | i |
| (4) | iii | i | iv | ii |

5. शुद्धलेखन नियमांनुसार अचूक शब्दांचा गट ओळखा.

a. ऊहापोह, नावीन्य, उत्कृष्ट
b. मथितार्थ, घनश्याम,बलिष्ठ
c. इशारा, अलीकडे,वाङ्मय
d. ऊष्ण, मंदीर, परिक्षा

(1) फक्त a व b बरोबर (2) फक्त c व d बरोबर
(3) फक्त a, b व c बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

6. ''सर्व मुले मोठ्याने बोलत होती'', या वाक्यातील क्रियाविशेषणाचा प्रकार सांगा.

(1) नामसाधित (2) विशेषणसाधित

(3) अव्ययसाधित (4) धातुसाधित

7. 'चपळ घोड्याने शर्यत जिंकली.' या वाक्यातील विशेषण ओळखा.

(1) चपळ घोड्याने (2) शर्यत जिंकली

(3) चपळ (4) जिंकली

8. त्या तिथे पलीकडे माझिया प्रियेचे झोपडे आहे. हे विधान कोणते क्रियाविशेषण आहे ?

(1) कालवाचक क्रियाविशेषण (2) स्थलवाचक क्रियाविशेषण

(3) रीतिवाचक क्रियाविशेषण (4) एकाक्षरी क्रियाविशेषण

9. पुढीलपैकी अनिश्चित संख्यावाचक विशेषण ओळखा.

(1) पाच (2) चारी

(3) तिसरा (4) थोडा

10. 'जेव्हा घाम गाळावा तेव्हाच खायला भाकरी मिळते.' हे वाक्य क्रियाविशेषणाच्या कोणत्या उपप्रकारातील आहे ?

(1) विरोधदर्शक (2) संकेतदर्शक

(3) कालदर्शक (4) स्थलदर्शक

11. वाक्याचा कर्ता व कर्त्यानंतर येणारे नाम दोघेही एकच व्यक्ती किंवा वस्तू दर्शवित असतील तर कर्त्यानंतर येणारे नाम

(1) कर्मपूरकाचे काम करते (2) विधेयपूरकाचे काम करते

(3) विधीपूरकाचे काम करते (4) आधारपूरकाचे काम करते

12. खालीलपैकी क्रियापदाचे वैशिष्ट्य कोणते आहे ?

a. धातू म्हणजे क्रियावाचक मूळ शब्द.

b. धातू ही विकारी शब्दजाती आहे.

c. क्रियापदे वाक्यातील क्रिया दाखवितात.

d. क्रियापदामुळेच वाक्य पूर्ण होते.

(1) फक्त a व b बरोबर (2) फक्त c व d बरोबर

(3) फक्त c बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

13. 'परवा वडिलांनी मुंबईहून एक सुंदर तैलचित्र अगदी स्वस्तात आणले.' या वाक्याचा वाक्यप्रकार ओळखा.
(1) संयुक्त वाक्य (2) मिश्र वाक्य
(3) केवल वाक्य (4) प्रश्नार्थी वाक्य

14. पुढीलपैकी 'संकेतार्थी' वाक्य ओळखा.
(1) वडिलांनी पैसे दिले असते, तर परीक्षा शुल्क भरले असते
(2) वडिलांनी पैसे दिल्यावर परीक्षा शुल्क भरतो
(3) वडील पैसे देतात, मी परीक्षा शुल्क भरतो
(4) वडिलांनी पैसे दिले, परीक्षा शुल्क भरले

15. 'व्यायाम करा आणि भरपूर खा.' या विधानाचे विध्यर्थी रूपांतर ओळखा.
(1) व्यायाम करू आणि भरपूर खाऊ (2) व्यायाम करावा आणि भरपूर खावे
(3) व्यायाम केल्यावर भरपूर खावे वाटते (4) व्यायाम केल्यास भरपूर खाता येते

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 16 ते 20 ची उत्तरे लिहा.**

१९१६ मध्ये सयाजीरावांनी बडोदा कॉलेजमध्ये तुलनात्मक धर्म अभ्यासाचे स्वतंत्र अध्यासन सुरू केले. १९१६ ते १९२१ ही पाच वर्षे प्रा. विजेरी यांच्या नेतृत्वाखाली या विभागाने अतिशय दैदीप्यमान कामगिरी केली. यानंतर विजेरी इंग्लंडला निघून गेले. त्यांना मदत करणारे प्रा. राजवाडे यांचे निधन झाले. त्यामुळे या अध्यासनाचे काम १९२२ पासून १९३४ पर्यंत बंद राहिले. या बारा वर्षांच्या खंडानंतर १९३५ ला डॉ. अली यांच्या नेतृत्वाखाली हे पुन्हा सुरू झाले आणि १९४१ पर्यंत अखंडित सुरू राहिले आणि पुन्हा एकदा या विभागाने भरारी घेतली. पहिली पाच वर्षे आणि नंतरची सहा वर्षे अशी अकरा वर्षे या विभागाने तुलनात्मक धर्म अभ्यासाला जे योगदान दिले त्याला भारताच्या इतिहासात तोड नाही. कारण अशा प्रकारचे हे भारतातील पहिले आणि शेवटचे अध्यासन होते. भारतासारख्या धर्म प्राबल्य असणाऱ्या देशात धर्माच्या वैज्ञानिक आणि तुलनात्मक अभ्यासाला प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्वच स्तरावर आजअखेर परिघाबाहेर ठेवले आहे. अपवाद राजस्थान विद्यापीठातील तुलनात्मक धर्म या एकमेव अभ्यासक्रमाचा आहे. अध्यासन मात्र भारतात कोणत्याही विद्यापीठात निर्माण झालेले नाही. या पार्श्वभूमीवर १०४ वर्षांपूर्वी सयाजीरावांनी भारतात तुलनात्मक धर्म अभ्यासाचा पाया घातला होता. त्यांचे हे काम म्हणजे धार्मिक सुसंवादासाठीचे धर्मसाक्षरता अभियान होते. अगदी आजही भारतात तुलनात्मक धर्म अभ्यासक सापडत नाहीत. भारतातील राजस्थान विद्यापीठाचा एक अपवाद वगळता विद्यापीठात तुलनात्मक धर्मशास्त्र अभ्यासक्रमातसुद्धाही नाही मग स्वतंत्र अध्यासनाची चर्चा तरी कशी करायची ? मग प्रश्न असा पडतो की सयाजीरावांनी त्या काळात या विषयातील तज्ञ उपलब्ध नसतानाही हे अध्यासन कसे चालवले असेल ?

आजही सयाजीरावांनी त्या काळात तुलनात्मक धर्म अभ्यासाच्या क्षेत्रात केलेल्या कामाच्या रस्त्याने जाणारे काम झालेले नाही. ११ वर्षातील या अध्यासनाच्या उपक्रमांचा आढावा घेतल्यानंतर या क्षेत्रातील संशोधनाला या विभागाने दिलेली चालना, प्रकाशित झालेले शोधनिबंध आणि ग्रंथ यांचे विषय आपल्याला थक्क करून सोडतात. यादृष्टीने १९१६ मध्ये ज्यांच्या नेतृत्वाखाली सयाजीरावांनी बडोद्यात तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन सुरू केले. त्यांना १९ ऑक्टोबर १९३२ मध्ये लिहीलेल्या पत्रात या विषयावर चर्चा केली आहे. कारण १९२२ ला विजेरी इंग्लंडला निघून गेल्यामुळे बंद पडलेले हे काम पुन्हा सुरू करण्याचा विचार महाराजांच्या डोक्यात होता. पुढे १९३५ मध्ये हे अध्यासन पुन्हा सुरू झाले. त्यामुळेच या पार्श्वभूमीवर विजेरीना लिहीलेल्या पत्रातील महाराजांची भूमिका समजून घेणे उपयुक्त ठरेल. महाराज लिहितात, ''बडोद्यामध्ये तुम्ही तुलनात्मक धर्मशास्त्र या विषयाचे प्राध्यापक होते. मला या विषयांमध्ये आजही रस आहे. मी सध्या नवीन धर्म काढण्याचा प्रयत्न करतोय, असे नाही. ते माझ्याकडून शक्य नाही, तर हिंदू धर्मातील नवीन पद्धती, त्याची तत्वे, प्रार्थना, गीते इ. यांना एकत्रित करून काही पुस्तके काढण्याचा प्रयत्न करतोय. याचा फायदा नव्या पिढीला होऊ शकेल. ही पुस्तके अगदी सोप्या भाषेत लिहिलेली असतील. श्रद्धेला बुद्धिप्रामाण्यवादी करण्यासाठी बराच पाठपुरावा आणि संयम लागणार आहे. जबरदस्ती किंवा सक्ती करून या बाबतीत फार काही प्रगती होऊ शकणार नाही. तुम्ही या कामात माझ्यासोबत असता तर आणखी बरे झाले असते. काही काळापूर्वी यासंदर्भात मी तुमच्याशी संपर्क केला होता; पण तेव्हा माझ्याच पूर्ण विचार झालेला नव्हता.''

**16.** सयाजीरावांनी कोणत्या धर्माभ्यासाला योगदान दिले ?

(1) वर्णनात्मक धर्माभ्यास
(2) तुलनात्मक धर्माभ्यास
(3) ऐतिहासिक धर्माभ्यास
(4) सनातनी धर्माभ्यास

---

**17.** सयाजीरावांनी धार्मिक सुसंवादासाठी कोणते अभियान चालविले ?

(1) धर्मशुद्धी अभियान
(2) धर्मसाक्षरता अभियान
(3) धर्मसंशोधन अभियान
(4) धर्मचिकित्सा अभियान

---

**18.** अध्यासनाने कोणते कार्य हाती घेतले होते ?

(1) शोधनिबंध आणि ग्रंथ प्रकाशन
(2) धर्मसुधारणा
(3) तत्त्वज्ञानाची चिकित्सा
(4) धर्मप्रसार

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**19.** सयाजीरावांनी श्रद्धेला कशाची जोड दिली ?

(1) धर्मप्रामाण्य (2) तत्त्वप्रामाण्य

(3) बुद्धिप्रामाण्य (4) व्यक्तीप्रामाण्य

**20.** वरील उताऱ्यास योग्य शीर्षक कोणते ?

(1) धर्माचा वैज्ञानिक अभ्यास (2) धर्मसंशोधन

(3) धर्मांधश्रद्धा (4) धर्मसाक्षरता

**21.** खालीलपैकी कोणता शब्द निपुण या शब्दाचा समानार्थी शब्द नाही ?

(1) कसबी (2) कुशल (3) निरामय (4) पारंगत

**22.** 'कृपण' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.

(1) उदार (2) कृतघ्न (3) कुत्सित (4) कंजूष

**23.** खालील शब्दजोडीतून अयोग्य शब्दजोडी ओळखा.

(1) ओठ – ओष्ठ्य (2) पिवळा – पित (3) जोगी – भोगी (4) काम –कार्य

**24.** खालीलपैकी कोणता पर्याय 'अन्योक्ती' शब्दाचा अर्थ स्पष्ट करतो.

(1) इतर व्यक्तीशी युक्तीवाद करणे

(2) एकाला उद्देशून दुसऱ्याला बोलणे

(3) एकाच वेळी अनेक गोष्टीत लक्ष देणारा

(4) तिथी, वार न ठरवता आलेला

**25.** 'दुःखामुळे सोडलेला दीर्घ श्वास' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द कोणता ?

(1) हतबलता (2) सुस्कारा

(3) उःश्वास (4) हुंदका

**26.** ''गंभीर चुकीमुळे सुनीता नवऱ्यासमोर अपराध्यासारखी उभी होती'', हे विधान कोणता वाक्प्रचार दर्शविते ?

(1) काकदृष्टीने पाहणे (2) जीवाचे रान करणे

(3) मनात मांडे खाणे (4) मूग धरून बसणे

**27.** 'स्वातंत्र्य सैनिकांचा आदर करा', या वाक्याचे नकारार्थी वाक्य बनवा.

(1) स्वातंत्र्य सैनिकांचा मान राखा

(2) स्वातंत्र्य सैनिकांचा अपमान नका करू

(3) स्वातंत्र्य सैनिकांना आदराने वागवा

(4) स्वातंत्र्य सैनिकांचा अनादर करू नका

**28.** खालील वाक्यांमधून सकर्मक क्रियापद असणारी वाक्ये ओळखा.

अ. त्याने दार उघडले.

ब. त्याला उदाहरण समजते.

क. राम शिवधनुष्य मोडतो.

ड. सरकार दुष्काळग्रस्तांना मदत देते.

(1) फक्त अ बरोबर (2) फक्त क बरोबर

(3) फक्त ब व ड बरोबर (4) फक्त अ व क बरोबर

**29.** 'शारदीय चांदण्यात समुद्र मनमोहक दिसतो', या वाक्यातील उद्देश्य कोणता ?

(1) शारदीय चांदण्यात (2) समुद्र

(3) मनमोहक (4) दिसतो

**30.** 'आपण देशासाठी त्याग करू.' वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) आज्ञार्थी (2) विध्यर्थी

(3) संकेतार्थी (4) अकरणरूपी

**31.** 'वाक्यार्थाला बाधा न आणता वाक्याच्या रचनेत केलेला बदल म्हणजे काय ?

(1) वाक्य पृथक्करण (2) वाक्य रूपांतर

(3) वाक्य विस्तार (4) वरीलपैकी नाही

**32.** 'जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग वचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीय-पुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असे स्वतंत्र असते', अशा प्रकारच्या वाक्यरचनेस काय म्हणतात ?

(1) कर्तरि प्रयोग (2) भावे प्रयोग

(3) कर्मणि प्रयोग (4) कर्मकर्तरी प्रयोग

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**33.** क्रियेचे पूर्णत्व हा क्रियापदाचा अर्थ असतो तेव्हा कर्मणी प्रयोगाचा कोणता उपप्रकार होतो ?

(1) शक्यकर्मणी
(2) पुराणकर्मणी
(3) समापन कर्मणी
(4) प्रधानकर्तृक कर्मणी

---

**34.** एखाद्या म्हणीतील ________ हा त्या म्हणीचा आत्मा असतो.

(1) उच्चार
(2) अलंकार
(3) अनुभव
(4) ध्वनी

---

**35.** समानार्थी म्हणींच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | आज अंबारी उद्या झोळी धरी | i. | खोड जडली बालपणी सुटता सुटेना |
| b. | मनसुबे केले नि दिवस निघून गेले | ii. | राखणदार दारात नि चोर शिरला घरात |
| c. | काडी चोर तो माडी चोर | iii. | असेल तेव्हा दिवाळी नसेल तेव्हा शिमगा |
| d. | वाऱ्यावर वरात दर्यावर घाला | iv. | मनात मनोरे पुढे ताट कोरे |

(1) a – iii b – iv c – i d – ii
(2) a – iii b – i c – iv d – ii
(3) a – iii b – iv c – ii d – i
(4) a – iv b – i c – ii d – iii

---

**36.** 'कपिलाषष्ठीचा योग' या संदर्भात विविध अर्थ असलेले शब्द कोणते ?

a. विलक्षण योगायोग
b. अपूर्व घटना
c. पुष्कळ काळाने येणारी संधी
d. कळीचा नारद

(1) फक्त a, b व c बरोबर
(2) फक्त a व c बरोबर
(3) फक्त b व d बरोबर
(4) सर्व पर्याय बरोबर

---

**37.** 'त्याच्यासारखा दुसरा कोणीच नाही असा', या शब्दसमुहासाठीचा योग्य अर्थ असणारा पर्याय निवडा.

(1) अद्वितीय (2) शूर (3) महान (4) धाडसी

**38.** 'अहमहमिका' या शब्दासाठी पर्यायी शब्द ओळखा.

(1) अहंभाव (2) द्वेष

(3) स्पर्धा (4) आकस

**39.** विरामचिन्हाचा अचूक वापर असणारे वाक्य कोणते ?

अ. हो. 'जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे.' जयंत म्हणाला.

ब. ''हो ! जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे,'' जयंत म्हणाला.

क. ''हो, 'जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे, जयंत म्हणाला.

ड. हो. जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे, जयंत म्हणाला.

(1) अ (2) ब

(3) अ आणि क (4) अ आणि ड

**40.** खाली दिलेल्या शब्दांपैकी मराठीत आलेला पोर्तुगीज शब्द ओळखा.

(1) सामान (2) पगार (3) भाकरी (4) तिकीट

**41.** खालीलपैकी कोणते विधान उद्गारार्थी आहे ?

(1) काल फार पाऊस पडला. (2) किती छान आहे हे फूल !

(3) आज बहुतेक पाऊस पडेल. (4) तू बाहेर केव्हा जाणार आहेस ?

**42.** खालील जोड्यांपैकी विसंगत जोडी ओळखा.

| | **'अ' (विभक्ती)** | | **'ब' (प्रत्यय)** |
|---|---|---|---|
| a. | द्वितीया | i. | चा, ची, चे |
| b. | षष्ठी | ii. | स, ला, ना, ते |
| c. | चतुर्थी | iii. | ऊन, हून |
| d. | तृतीया | iv. | स, ला, ते |

(1) a – ii

(2) b – i

(3) c – iv

(4) d – iii

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**43.** कोणत्याही काळात असणे आणि विचार व्यक्त करणे हे कोणत्या प्रकारच्या वाक्यांचे गुणधर्म आहेत ?

(1) विधानार्थी (2) प्रश्नार्थी

(3) उद्‌गारार्थी (4) स्वार्थी

---

**44.** 'पाऊस वेळेवर आला, म्हणून पिके वाचली.' वाक्यप्रकार ओळखा.

(1) प्रश्नार्थी वाक्य (2) संयुक्त वाक्य

(3) मिश्र वाक्य (4) केवल वाक्य

---

**45.** 'मी खूप कष्ट करून पैसा मिळविन.' या वाक्याचा प्रकार कोणता ?

(1) उद्‌गारवाचक (2) विध्यर्थी

(3) संकेतार्थी (4) आज्ञार्थी

---

**46.** खालीलपैकी तद्‌भव शब्दांचा गट ओळखा.

a. कर्ण, चक्र, विद्‌वान, जल

b. अर्ज, अत्तर, पगार, चिमणी

c. पाय, पान, सासू, सासरा

d. गुरू, पुत्र, पुष्प, अग्नि

(1) a व b बरोबर

(2) a व d बरोबर

(3) c बरोबर

(4) सर्व पर्याय बरोबर

---

**47.** 'वाढदिवसानिमित्ताने गौरीला अक्षयकडून हिरेजडित __________ मिळाला'. रिकाम्या जागी उपसर्गघटित शब्दाचा वापर करा.

अ. उपहार

ब. नजराणा

क. भेट

ड. माळ

(1) अ (2) अ आणि ब

(3) क (4) ब आणि ड

---

**48.** योग्य जोड्या जुळवा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| a. | उपसर्गघटित | i. | नीलकंठ |
| b. | प्रत्ययघटित | ii. | निरोगी |
| c. | अभ्यस्त शब्द | iii. | रक्षक |
| d. | सामासिक शब्द | iv. | घरघर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | iv | ii | i |
| (2) | iv | ii | i | iii |
| (3) | ii | iii | iv | i |
| (4) | iii | i | ii | iv |

**49.** विरुद्धार्थी वाक्प्रचारांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | उखळ पांढरे होणे | i. | धन शून्यावर येणे |
| b. | द्राविडी प्राणायाम करणे | ii. | अभय देणे |
| c. | मूळावर येणे | iii. | उकिरडे फुंकणे |
| d. | उदरी शनी येणे | iv. | हातचा मळ असणे |

(1) a – iii b – iv c – i d – ii

(2) a – iv b – i c – ii d – iii

(3) a – iii b – ii c – iv d – i

(4) a – iii b – iv c – ii d – i

**50.** खालील प्रसंगाला योग्य म्हण ओळखा.

'मुला तुझ्या वडिलांनी खेड्यात जाऊन राहण्याचा निर्णय घेतलाय. तू म्हणतोस, मला त्यांच्याबरोबर जाऊ नकोस, तुला झेपणार नाही. पण आता राहिलंय काय माझं!'

(1) जिकडे खोबरं तिकडे चांगभलं

(2) जिकडे सुई तिकडे दोरा

(3) जिकडे पोळी तिकडे गोंडा घोळी

(4) जसा भाव तसा देव

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

51. Find out the meaning of the phrase underlined in the following sentence :
"Will you call on him today and tell him that he is to reach the office by 7 a.m. tomorrow ?"
(1) To shout
(2) To remember
(3) To pay a visit to
(4) To invite

52. Find out the correct meaning of the underlined idiom in the given sentence :
"It is unfortunate that India has mostly been at loggerheads with all her neighbours."
(1) To be on good terms
(2) To invite
(3) Doing business only
(4) Disagreeing or quarreling with

53. Choose the one word which is closest to the opposite in meaning of the underlined word in the given sentence :
"There was no altruistic motive that prompted him."
(1) Inhuman (2) Selfish
(3) Wicked (4) Brutal

54. Choose the meaning of the words underlined in the following sentences :
a. The villagers may be coarse in their looks but they are very innocent at heart.
b. The river appears to be changing its course.
(1) a – Poor b – Water
(2) a – Pleasant b – Subject
(3) a – Beautiful b – Subject
(4) a – Rough b – Direction

55. Find out the meaning of the words underlined in the given sentences :

a. Urban employment is a major problem.

b. He is the soul of urbanity and wit.

(1) a – In cities b – Sophistication

(2) a – Corporate b – Wisdom

(3) a – Industrial b – Comedy

(4) a – In banks b – Fashion

56. Choose the correctly punctuated sentence for the following :
akbar said to tansen will you take me to him

a. Akbar said to Tansen, "will you take me to him."

b. Akbar said to Tansen, "Will you take me to him ?"

c. Akbar said to Tansen, "Will you take me to him."

d. akbar said to tansen, "Will you take me to him ?"

(1) Only a and c (2) Only b

(3) Only c and d (4) Only d

57. Which of the following is/are the correct negative sentence/s for –
"We admit that we went to see a film."

a. We admit that we did not go to see the film.

b. We admit going not to see a film.

c. We deny that we did not go to see a film.

d. We do not deny that we went to see a film.

(1) Only a and c (2) Only b

(3) Only b and c (4) Only d

58. 'She gave the boy a book.'
Change this sentence into passive voice.

a. The boy was given a book by her.

b. The boy gave a book by her.

c. A book was given to the boy by her.

d. A book was given to her by the boy.

(1) Only a and d (2) Only a and c

(3) Only b and d (4) Only b

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**59.** Which of the following is the correct noun form of the word 'Destroy' ?

(1) Destructive (2) Destruction

(3) Destruct (4) Destructing

**60.** Find out "One word" for the underlined words :

"One who is a good judge of an art."

(1) Connoisseur

(2) Hypocrite

(3) Pioneer

(4) Cartographer

**61.** The word "run" can have multiple meanings. In which of the following contexts does "run" represent the action of movement on foot ?

(1) "I need to go for a run to stay fit."

(2) "The water began to run out of the faucet."

(3) "She runs a successful business."

(4) "He has a long run ahead of him in the marathon."

**62.** Which word represents the phrase "excessively talkative" ?

(1) Taciturn (2) Evasive (3) Reticent (4) Loquacious

**63.** Select the sentence with the correct use of preposition.

(1) My parents are concerned in my health

(2) My parents are concerned at my health

(3) My parents are concerned for my health

(4) My parents are concerned to my health

**64.** Identify the type of phrase underlined in the following sentence.

'The umbrella with a broken handle is mine.'

(1) Noun phrase (2) Adverb phrase

(3) Adjective phrase (4) Verbal phrase

65. Identify the grammatically correct sentence/s.
   a. His parents loves him a lot.
   b. His courage won him honour.
   c. We all got very wet.
   d. They are been watched by the cops.

(1) a and b only
(2) b and c only
(3) c and d only
(4) a and d only

**Q. No.'s 66 to 70 : Read the given passage carefully and answer the questions based on it that follow :**

Archaeology as a profession faces two major problems. First, it is the poorest of the poor. Only paltry sums are available for excavating and even less is available for publishing the results and preserving the sites once excavated. Yet archaeologists deal with priceless objects every day. Second, there is the problem of illegal excavation, resulting in museum-quality pieces being sold to the highest bidder.

I would like to make an outrageous suggestion that would at one stroke provide funds for archaeology and reduce the amount of illegal digging. I would propose that scientific archaeological expeditions and governmental authorities sell excavated artifacts on the open market. Such sales would provide substantial funds for the excavation and preservation of archaeological sites and the publication of results. At the same time, they would break the illegal excavator's grip on the market, thereby decreasing the inducement to engage in illegal activities.

You might object that professionals excavate to acquire knowledge, not money. Moreover, ancient artifacts are part of our global cultural heritage, which should be available for all to appreciate, not sold to the highest bidder. I agree. Sell nothing that has unique artistic merit or scientific value. But you might reply everything that comes out of the ground has scientific value. Here we part company. Theoretically, you may be correct in claiming that every artifact has potential scientific value. Practically you are wrong.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

I refer to the thousands of pottery vessels and ancient lamps that are essentially duplicates of one another. In one small excavation in Cyprus, archaeologists recently uncovered 2,000 virtually indistinguishable small jugs in a single courtyard. The basements of museums are simply not large enough to store the artifacts that are likely to be discovered in the future. There is not enough money even to catalogue the finds; as a result, they cannot be found again and become as inaccessible as if they had never been discovered. Indeed, with the help of a computer, sold artifacts could be more accessible than are the pieces stored in bulging museum basements. Prior to sale, each could be photographed and the list of the purchasers could be maintained on the computer. A purchaser could even be required to agree to return the piece if it should become needed for scientific purposes.

Fill in the blank.

**66.** Computer can make sold artifacts more ____________.

(1) Artistic (2) Accessible

(3) Beautiful (4) Scientific

---

**67.** What is the solution to the issues of lack of funds for archaeology ?

(1) Governmental authorities should sell excavated artifacts in the open market

(2) Only selected excavations should be undertaken

(3) Computers should be used in excavations

(4) Ordinary sites should not be excavated

---

**68.** Which of the following statement/s is/are true in the context of the passage ?

a. Illegal excavation is a challenge in the profession of archaeology.

b. Museums have shortage of space to store excavated artifacts.

c. The author argues that professionals should excavate for money.

(1) c only

(2) a and b only

(3) b and c only

(4) a, b and c

---

**69.** What are the advantages of selling excavated artifacts instead of storing them ?

a. Photographs of sold artifacts can be taken.
b. List of purchasers can be kept.
c. Selling the artifacts would make them more popular.

(1) b only
(2) a and b only
(3) a and c only
(4) a, b and c

---

**70.** Which statement/s is/are true in the context of the excavation in cyprus mentioned in the passage ?

a. Around 2,000 small jugs were uncovered.
b. The excavation was very big.
c. The jugs were almost similar to one another.

(1) c only (2) a and b only
(3) a and c only (4) a, b and c

---

**71.** Select the correct word for the following group of words.

'One who talks much with little sense'

(1) Garrulous (2) Gaurmand
(3) Gregarious (4) None of the above

---

**72.** Select the correct option to complete the given sentence.

'Honest bureaucrats hate to be ___________ by their ___________ bosses.'

(1) Pressured, Politically (2) Pressurised, Political
(3) Pressure, Politics (4) None of the above

---

**73.** Identify the correct suffix in the word "preference".

(1) pre – (2) – rence
(3) – ence (4) None of the above

---

**74.** Fill in the blanks with the correct pair of the articles.

______________ young and __________ old both participated in the rally.

(1) the, an (2) the, the (3) a, an (4) a, a

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**75.** Match the words in column 'A' with their opposite meanings in column 'B'.

| 'A' | 'B' |
|---|---|
| A. Fickle | i. Ferocious |
| B. Frugal | ii. Extravagant |
| C. Loyal | iii. Constant |
| D. Gentle | iv. Treacherous |

(1) A – iv, B – ii, C – i, D – iii (2) A – iii, B – i, C – ii, D – iv

(3) A – iii, B – ii, C – iv, D – i (4) A – iii, B – ii, C – i, D – iv

---

**76.** Fill in the blank.

That he will be elected the Prime Minister __________.

(1) everyone is expecting (2) everyone expected

(3) everyone expects (4) is expected by everyone

---

**77.** i. Please, <u>boil</u> the water.

ii. The water is <u>boiling</u>.

The underlined verbs in the sentences above belong to the types of verb called ________ and __________ respectively.

(1) Transitive, Transitive (2) Intransitive, Transitive

(3) Transitive, Intransitive (4) Intransitive, Intransitive

---

**78.** 'I find no chance __________ making a profit in this business.'

Which of the following prepositions correctly fills in the blank in the sentence above ?

(1) in (2) of (3) to (4) for

---

**79.** '<u>The small child</u> was crying for ______ mother.'

Which of the following correctly agrees with the underlined subject noun in the sentence above ?

(1) his (2) her (3) their (4) its

---

**80.** 'It is imperative that he catch the next plane.'

The sentence above expresses ____________ mood/moods.

(1) Indicative (2) Subjunctive

(3) Imperative (4) Both indicative and imperative

**81.** a. If you come the bank will be able to help you.

b. Had I known it, I would come to you.

c. Unless the floods went down, we shan't be able to drop food-packets.

Identify the grammatically correct sentence/s.

(1) Only a (2) Only b (3) Only a and c (4) Only b and c

**82.** 'I do my work myself.'

Identify the type of the pronoun underlined in the above sentence.

(1) Relative (2) Reflexive (3) Emphatic (4) Personal

**83.** Fill in the blank with the most appropriate prepositions given below.

'A boy jumped ______________ the well.'

(1) in (2) at (3) into (4) on

**84.** Identify the clause elements in the given sentence.

'They call me the Texas Ranger.'

(1) SPOA (2) SPOC (3) SPAO (4) SPCA

**85.** Identify the unit in which there is an error.

She had been a nurse (a) for three years and then (b) she wants to study medicine (c).

(1) Only a (2) Only b (3) Only c (4) No error

**86.** Fill in the blank with the correct antonym of the underlined word.

'Rohini's father is bold but her husband is ___________.

(1) Wise (2) Timid (3) Lazy (4) Sharp

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**87.** Choose the incorrect sentence/s from the following :

a. Joseph is very clever.
b. My father is a farmer.
c. Character, and not looks, matter in the long run.
d. While working with others, we have to help each other.

(1) a only (2) b and c only (3) c only (4) c and d

---

**88.** Fill in the blanks.

a. It was a secret ______________ my parents.
b. __________ his Aunt, he has six other female relations.
c. Lord Roseberry took her ____________ dinner.

(1) Among, besides, in to (2) Among, beside, into
(3) Between, beside, into (4) Between, besides, in to

---

**89.** Choose the correct sentences.

a. He has made quite a fortune.
b. She sang last night beautifully at the concert.
c. You gave me a big shock !

(1) c only (2) b and c only (3) a and c only (4) a, b and c

---

**90.** Choose the best option to fill in the blank.

______________ does not concern me.

(1) What he has done (2) What has he done
(3) What did he do (4) What does he do

---

**91.** 'Had you been there, we could have fought it out with them.'

The underlined clause in the sentence above exemplifies ____________.

(1) Adverb clause of cause
(2) Adverb clause of condition
(3) Adverb clause of concession
(4) Adverb clause of result

---

**92.** 'Let Mr. Yadav preside over the conference.'

Which of the following is the correct passive structure corresponding to the sentence above ?

(1) Let Mr. Yadav to be presided over the conference

(2) Let the conference to be presided over by Mr. Yadav

(3) Let the conference be presided over by Mr. Yadav

(4) Let the conference to preside over by Mr. Yadav

---

**93.** a. It is time I prayed.

b. Kindly excuse me.

c. Long live the Prime Minister.

d. Are you happy ?

Identify the sentence/s in subjunctive mood.

(1) Only a (2) Only b and d (3) Only a and c (4) Only b

---

**94.** a. He is senior than you by two years.

b. This calf is older than that.

c. He has greater popularity than any other leader.

Identify the correct sentence/s.

(1) Only a and b (2) Only b and c (3) Only a (4) Only c

---

**95.** a. This picture is very attractive, isn't it ?

b. Now do it as I tell you, won't you ?

c. She needn't work so late, need she ?

d. I am rather late, am I ?

Identify the sentence/s with correct question tag.

(1) Only a and b (2) Only b and c

(3) Only a and c (4) Only a, b and d

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**96.** Complete the following idiomatic expression with the correct option :

Well, that's fine kettle of ________. I thought I was helping John but he worked against me during the debate session.

(1) Fish (2) Soup (3) Tea (4) Broth

---

**97.** Fill in the blank with the most appropriate option from the one given below.

________ occurs when a part of something is used to refer to the whole.

(1) Allegory (2) Apostrophe

(3) Synecdoche (4) Metonymy

---

**98.** After presenting all the evidence in the court, the prosecutor delivered a powerful closing statement to drive home the seriousness of the crime. What does the phrase "to drive home" mean ?

(1) To return home after a long journey

(2) To forcefully convey or emphasize a point or message

(3) To operate a vehicle and reach a destination

(4) To invite someone to come to your residence

---

**99.** Identify the idiom that means "to accept the consequences of one's actions."

(1) Cut corners (2) Take the bull by the horns

(3) Face the music (4) Go the extra mile

---

**100.** Which of the following sentences correctly uses the meaning of the word "overstated" ?

(1) She understated her accomplishments to impress the interviewer.

(2) He downplayed the importance of the project during the presentation.

(3) They exaggerated the size of the fish they caught.

(4) The athlete achieved his goal through hard work and dedication.

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** ''अंगावर काटा उभा रहाणे'' या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे
(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) अतिशय भिती वाटणे'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

SEAL

क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**